**वनविभागातील गट-अ व गट-ब (राजपत्रित) मधील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्याबाबत नागरी सेवा मंडळ स्थापन करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

**शासन निर्णय क्र.एमएफएस-२०१४/ प्र.क्र. ५७/फ-८**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- ३१ जानेवारी, २०१५.

<u>वाचा</u> :- १) मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन (सिव्हील) क्र.८२/२०११ मध्ये दि.३१/१०/२०१३ रोजी दिलेला निर्णय.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.२६/१२, दिनांक ३१ जानेवारी, २०१४

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एमएफएस-२०१४/प्र.क्र.५७/फ-८, दिनांक ०७ मे, २०१४

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.२६/१२, दिनांक २० मे, २०१४

५) शासन अधिसुचना महसूल व वन विभाग क्र. एफएसटी-११/१४/प्र.क्र.६५८/फ-४ दि.८/१२/२०१४

६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.२६/१२, दिनांक १९ जानेवारी, २०१५

<u>**प्रस्तावना :-**</u>

मा.सर्वोच्च न्यायालयाने संदर्भाधीन क्र.१ नुसार दिलेल्या निदेशाचे पालन करण्यासाठी शासन सेवेतील गट अ, गट ब व गट क मधील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळ स्थापन करण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागाने दि.३१/०१/२०१४ रोजी निर्गमित केले आहेत. सदरहू शासन निर्णयाच्या धर्तीवर वन विभागातील गट-अ , गट-ब व गट-क या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी संदर्भ क्र -३ येथील शासन निर्णयान्वये नागरी सेवा मंडळ स्थापन करण्यात आले होते. परंतु सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र.-४ येथील निर्णयान्वये त्यांच्या दि.३१.१.२०१४ रोजीच्या शासन निर्णयास पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती दिली होती. परंतु सामान्य प्रशासन विभागाने उपरोक्त संदर्भ क्र-६ येथील शासन निर्णयान्वये याप्रकरणी त्यांच्या दि.२०.०५.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेली स्थगिती उठविली आहे. त्यानुषंगाने वन विभागातील गट-अ , गट-ब व गट-क या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या अधिकारी /

कर्मचाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

२. यासंदर्भात शासनाने संदर्भ क्र-३ येथील शासन निर्णय अधिक्रमित करून खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

वन विभागातील गट-अ व गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी खालीलप्रमाणे नागरी सेवा मंडळ स्थापन करण्यात येत आहे :-

**(अ) नागरी सेवा मंडळ (१)**

| | | |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (वने) | अध्यक्ष |
| २ | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर (विभागीय वन अधिकारी व सहाय्यक वनसंरक्षक या संवर्गासाठी) | सदस्य |
| ३ | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), म.रा. नागपूर (वनक्षेत्रपाल, प्रशासकीय अधिकारी व इतर गट-ब संवर्गातील अधिका-यांसाठी) | सदस्य |
| ४ | सचिव / सह सचिव आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |

३. गट - अ व गट - ब (राजपत्रित) पदांवर पदोन्नती / सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग वाटप, सामान्य प्रशासन विभाग (सेवा उपविभागाने) अंतिम केल्यावर त्या यादीतील अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेचा प्रस्ताव विभाग प्रमुख यांनी नागरी सेवा मंडळासमोर सादर करण्याकरीता वन विभागाकडे सादर करावा.

४. बदल्यांबाबत शिफारशीसाठी प्रस्ताव नागरी सेवा मंडळासमोर ठेवण्यासाठी सादर करताना, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार कार्यवाहीबाबत वस्तुस्थिती तसेच प्रस्तावित बदल्यांबाबतची पार्श्वभूमी / वस्तुस्थिती, नागरी सेवा मंडळाच्या निदर्शनास आणण्यासाठी प्रस्तावासोबत सादर करण्यात यावी.

५. पदस्थापनेसाठीच्या प्रस्तावावर नागरी सेवा मंडळाकडून शिफारस प्राप्त झाल्यावर, मंडळाच्या शिफारशीनुसार प्रस्ताव सक्षम प्राधिकारी तथा शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. त्यावर अंतिम निर्णय सक्षम प्राधिकाऱ्याकडून घेण्यात येईल.

६. संदर्भ क्र.७ मधील शासन अधिसूचनेन्वये वनक्षेत्रपाल आणि तत्सम गट-ब संवर्गातील (राजपत्रित) अधिका-यांचे बदल्यांचे अधिकार क्षेत्रीयस्तरावरील समित्यांकडे विकेंद्रित करण्यात आले

आहे. सदर समित्या हया वनक्षेत्रपाल व इतर गट-ब संवर्गातील बदल्यांसाठी नागरी सेवा मंडळ म्हणून काम करतील.

७. बदलीसाठीच्या प्रस्तावावर नागरी सेवा मंडळाकडून शिफारस झाल्यावर मंडळाच्या शिफारशीनुसार सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन अधिनियमातील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी तथा शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतील. त्यावर अंतिम निर्णय सक्षम प्राधिकाऱ्याकडून घेण्यात येईल. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१९.०१.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार अत्यंत आवश्यक असल्यास, नागरी सेवा मंडळाकडून प्राप्त झालेल्या शिफारशीमध्ये बदल करण्याचा अधिकार शासनास राहील.

८. बदल्यांच्या प्रस्तावांवर, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

९. विभाग प्रमुखांनी या आदेशाचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२०४११४६२९२४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatraye Laxman Thorat

Digitally signed by Dattatraye Laxman Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dattatraye Laxman Thorat
Date: 2015.02.04 14:42:32 +05'30'

**(द. ल. थोरात)**
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

**प्रति,**

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, म.रा., पुणे.
३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादीत, नागपूर.
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
६) सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव)
७) सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १२), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
९) वन विभागातील सर्व कार्यासने.
१०) निवडनस्ती (फ-८ कार्यासन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२